दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक २१४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.४ नोव्हेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## बावीस लाखांचा गंडा घालणाऱ्या बिल्डरविरोधात महाडमध्ये गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । महाड**

एका ग्राहकाला बावीस लाख रूपयांना गंडा घातल्याप्रकरणी महाड शहरातीलल बिल्डर योगेश कळमकर याच्याविरोधात शहर पोलीस ठाण्यात आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रकाश हरिभाऊ पवार (रा. चांभारखिंड, महाड) यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. पवार यांनी योगेश कळमकर याच्या योग एन्टरप्राईझेसतर्फे बांधण्यात येत असलेल्या साईयोग इमारतीमध्ये प्रत्येकी ६५० चौरस फुटांच्या दोन सदनिका बुक केल्या होत्या आणि या व्यवहारापोटी त्यांनी योगेश कळमकर याला बावीस लाख रूपये ॲडव्हान्स दिले होते. प्रत्यक्ष योगेश कळमकर याने या सदनिका प्रकाश पवार यांना न देता, परस्पर अन्य इसमास त्याची विक्री करून पवार यांची फसवणूक केली. या प्रकरणी पवार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार महाड शहर पोलिसांनी योगेश कळमकर याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे. योगेश कळमकर याच्याविरोधात यापूर्वीही असे फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. काही काळ फरार राहिल्यानंतर त्याला पोलिसांनी अटक केली होती.

# अरे बाप रे! कॉरिडोअरसाठी शासनसंपादीत असलेल्या जमिन विक्रीचा अधिकार प्रांतांना दिला कुणी?

## त्या पोटी किती माया घेतली असावी हा ही प्रश्न गहन आहे?

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल-उरण प्रांतांचे प्रताप रायगड नगरीने भांडाफोड केल्यावर लोक रायगड नगरीच्या मुख्य संपादकांना भेटत असून आपले गाऱ्हाणे सादर करीत आहेत. त्यामुळे या प्रांतांनी अब्जावधी रुपयाची माया जमा केली असल्याचा संशय निर्माण होत असून शेतकरी वर्गामध्ये नाराजीचा सुर पसरला आहे. परंतु या प्रांतांना एका माजी मंत्र्याचा वरदहस्त असल्यामुळे त्यांच्यावर अद्याप कारवाई झाली नव्हती. परंतु नवे सरकार काय कारवाई करणार याकडे पनवेल-उरण तालुक्यातील जनतेचे लक्ष लागून राहिले आहे.

पनवेल तालुक्यातील विरार-अलिबाग कॉरिडोअरसाठी शासनाने संपादीत केलेल्या जमिनीच्या विक्रीची परवानगी कशी दिली? हा ही प्रश्न गहन आहे. त्यामुळे या प्रकरणात देखील प्रांतांनी आपले हात ओले केल्याचा संशय संबंधित शेतकऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. म्हणूनच भ्रष्टाचाराने पोखरलेल्या पनवेल प्रांतांची लाचलुचपत खात्याबरोबरच ईडी आणि सीबीआय मार्फत चौकशी व्हावी. जेणेकरून या तालुक्यात चाललेला भ्रष्टाचार जनतेसमोर उघड होवू शकतो. म्हणून नव्या शासनाने यावर उचित कारवाई करावी, अशी मागणी पनवेल-उरण तालुक्यातील शेतकरी वर्गाकडून केली जात आहे. तसेच सर्वसामान्य शेतकरी वर्गाचे जमिनी संदर्भात चाललेल्या सुनावणीमध्ये एजंट असेल तर तात्काळ त्यांना न्याय दिला जातो, अशी चर्चा आहे. परंतु सर्वसामान्य शेतकरी वर्गाला न्यायापासून वंचित ठेवले जाते.

# पनवेल प्रवासी संघाच्या आंदोलनास भरघोस प्रतिसाद

## पनवेल एसटी स्टँड मधील संकुल उभारणीबाबत पंधरा दिवसांत एसटी प्रशासनासोबत होणार बैठक





**दै.रायगड नगरी । पनवेल**

**एक हाक प्रवाशांच्या सेवेसाठी असे म्हणत पनवेल प्रवासी संघाने एसटी स्थानकातील संकुलाच्या रखडलेल्या कामास त्वरित सुरुवात करावी या मुख्य मागणीसाठी आज गुरुवार दिनांक ३ नोव्हेंबर रोजी लाक्षणिक धरणे आंदोलन केले. प्रवासी, सेवाभावी संघटना, आणि बहुतांश राजकीय पक्षांच्या नेते व कार्यकर्त्यांनी या आंदोलनात हिरीरीने सहभागी होऊन एसटी स्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी आग्रही मागणी केली. भरघोस प्रतिसाद लाभलेल्या आंदोलनाची दखल घेत एसटी प्रशासनाच्या वतीने कार्यकारी अभियंते व विभागीय अभियंते यांनी आंदोलन स्थळी येऊन आंदोलनकर्त्यांची भेट घेतली आणि आगामी १५ दिवसात प्रकल्पास प्रारंभ करण्यासंदर्भात प्रशासनासोबत बैठक घेण्याचे आश्वासन दिले. तर आगामी तीस दिवसात प्रत्यक्ष कामास सुरुवात न झाल्यास आंदोलनाची धार तीव्र करणार असल्याचे पनवेल प्रवासी संघाच्या वतीने सांगण्यात आले.**




पनवेल प्रवासी संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर भक्ती कुमार दवे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले होते. कार्याध्यक्ष अभिजीत पाटील यांच्या देखरेखीखाली आंदोलनाचे नियोजन करण्यात आले होते.२००९ साली राज्य परिवहन मंडळाच्या पनवेल स्थानकातील मुख्य इमारत धोकादायक असल्याचा ठपका ठेवत पाडण्यात आली. त्यानंतर बांधा व हस्तांतरित करा या धर्तीवरती उभारण्यात येणाऱ्या महाराष्ट्रातल्या पाच स्थानकांमध्ये पनवेल स्थानकाची निवड केली गेली.२०१८ साली या प्रकल्पाकरिता मान्यता प्राप्त झाली. परंतु जुने संकुल पाडल्यानंतर १४ वर्षे उलटून गेली आहेत पण अद्यापही प्रत्यक्ष कामास सुरुवात नाही.तब्बल १४ वर्षे या कामाचा पाठपुरावा करणाऱ्या पनवेल प्रवासी संघाने प्रत्यक्ष कामास सुरुवात होत नसल्याचे पाहून आंदोलनाचे संविधानिक हत्यार उपसले. पनवेल प्रवासी संघाचे अध्यक्ष डॉ भक्ती कुमार दवे, कार्याध्यक्ष अभिजीत पाटील, उपाध्यक्ष यशवंत ठाकरे, सचिव श्रीकांत बापट, निलेश जोशी हे आंदोलन स्थळी धरणे देण्यासाठी स्थानापन्न झाले होते.

कोकण शिक्षक मतदार संघाचे महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेत प्रतिनिधित्व करणारे आमदार बाळाराम पाटील, सुप्रसिद्ध उद्योजक तथा शेकापनेते जे एम म्हात्रे,रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष तथा इंटक चे राष्ट्रीय सचिव महेंद्र घरत, शिवसेनेचे सल्लागार तथा प्रवक्ते बबनदादा पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, शिवसेनेचे पनवेल शहर जिल्हा प्रमुख शिरीष घरत, शेका पक्षाचे पनवेल विधानसभा मतदार संघ अध्यक्ष काशिनाथ पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल शहर जिल्हा चिटणीस गणेश कडू, पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी,काँग्रेस चे पनवेल शहर जिल्हा सरचिटणीस मल्लिनाथ गायकवाड, काँग्रेसचे पनवेल तालुका अध्यक्ष नंदराज मुंगाजी, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस ओबीसी सेल अध्यक्ष तथा NMGKS चे सचिव वैभव पाटील, कृषी उत्पन्न बाजार समिती पनवेल चे सभापती दत्तात्रय पाटील, माजी सभापती मोहन कडू,ज्येष्ठ नेते जी आर पाटील, एड.के एस पाटील, नगरसेवक रवींद्र भगत, काँग्रेस पक्षाच्या पनवेल शहर जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष निर्मलाताई म्हात्रे, माजी नगरसेविका शशिकला सिंग, शिवसेना नेते शिरीष बुटाला, शिवसेनेचे पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव,श्रुती शाम म्हात्रे, माजी नगराध्यक्ष सुनील मोहोड,पनवेल युवक काँग्रेस अध्यक्ष राजेश जाधव,विश्वास पेटकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे पनवेल शहर जिल्हा कामगार सेल उपाध्यक्ष अमित लोखंडे,आदी राजकीय प्रभूतींनी आंदोलनाला पाठिंबा दिला.

सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या सामाजिक संस्थांनी देखील पनवेल प्रवासी संघाच्या आंदोलनाला भरघोस प्रतिसाद दिला. पनवेल संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा ज्येष्ठ आणि निर्भिड पत्रकार कांतीलाल कडू यांनी प्रकल्प रखडविल्या साठी आमदार आणि खासदार अशा लोकप्रतिनिधींवर प्रखर शाब्दिक आसूड ओढले, प्रकल्प पूर्ण होईपर्यंत ते आणि त्यांची संस्था डॉक्टर भक्ती कुमार दवे आणि पनवेल प्रवासी संघाच्या सोबत असेल अशी ग्वाही त्यांनी दिली. ९५ गाव संघर्ष समिती चे अध्यक्ष ॲड सुरेश ठाकूर, सरचिटणीस सुधाकर पाटील,सिटीझन युनिटी फोरम च्या रंजना सडोलीकर,सुरेश सडोलिकर जनजागृती ग्राहक संरक्षण मंच चे रायगड जिल्हा अध्यक्ष काशिनाथ जाधव, पनवेल तालुका अध्यक्ष बी पी म्हात्रे,खारघर फोरम च्या लीना गरड यांच्यासोबतच निवृत्त सेवक संघ, ज्येष्ठ नागरिक संघ, बहुजन समाज पार्टी,आदिवासी सेवा संघ अशा संघटनांनी आंदोलनात सहभागी होऊन त्यांचा पाठिंबा दर्शविला.

आंदोलनाच्या सुरुवातीला डॉक्टर भक्ती कुमार दवे यांनी प्रास्ताविक सादर केले. पनवेल प्रवासी संघ करत असलेल्या पाठपुराव्या बाबत उपस्थितांना अवगत करत त्यांनी आंदोलना पाठीमागची पार्श्वभूमी विशद केली. कार्यक्रमाचे अंति सुदाम पाटील यांनी पाठिंबा देणाऱ्यांचे, सहभागी होणाऱ्यांचे आणि आंदोलनाचे नियोजन करणाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

**एसटी प्रशासनाच्या वतीने कार्यकारी अभियंता विजय रेडेकर, विभागीय अभियंता विजय सावंत यांनी आंदोलन स्थळी येऊन पुढील पंधरा दिवसात स्थानक संकुल उभारणी बाबत प्रवासी संघ आणि एसटी प्रशासन यांच्या दरम्यान बैठक घेणार असल्याचे आश्वासन दिले.**

'एक हाक प्रवाशांच्या सोयीसाठी' असे म्हणत पनवेल प्रवासी संघाने पनवेल एसटी स्थानकातील संकुल उभारणीचे काम तातडीने सुरू झाले पाहिजे यासाठी आंदोलनाची हाक दिली होती. या आंदोलनात सर्व राजकिय नेतेमंडळी, सामाजिक संघटना, पनवेलकर नागरिक यांच्यासह आदींनी सहभागी होऊन पाठिंबा दर्शविला याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो. आज जरी एसटी प्रशासनाने बैठकीचे आश्वासन दिले असले तरीदेखील हा प्रकल्प पूर्ण होईपर्यंत आमचा संघर्ष सुरू राहणार आहे. या संघर्षात आपण अशीच आपली मोलाची साथ आम्हाला द्याल यात माझ्या मनात जराही दुमत नाही. पुनश्च एकदा मनःपूर्वक धन्यवाद.

**– अभिजीत पाटील, कार्याध्यक्ष– पनवेल प्रवासी संघ**

पनवेल प्रवासी संघांचे मनापासून अभिनंदन करतो की त्यांनी रायगड आणि मुंबईला जोडणाऱ्या पनवेल बस स्थानकाचा प्रदीर्घ काळापासून रेंगाळलेला विषय मार्गी लावण्याच्या उद्देशाने आज धरणे आंदोलन केले. पनवेलकरांचे ही अभिनंदन करतो कारण पनवेलमधील राजकीय पक्ष, सेवाभावी संघटना आणि सर्वसामान्य पनवेलकर यामध्ये उपस्थित राहिले. एसटीच्यावतीने कार्यकारी अभियंता रेडेकर यांनी माहिती देण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांच्याकडे पुरेशी माहिती नव्हती. त्यामुळे प्रवासी संघाकडून त्यांना असे सांगण्यात आले की ८ दिवसाचा वेळ घ्या आणि याबाबतीतील वस्तुस्थिती तपासून त्याबाबतची माहिती आमच्यापर्यंत सुपूर्त करा. डीसायडिंग ऑफिसर सोबत बसून याबद्दलचा निर्णय घेऊया. १९ डिसेंबर पासुन अधिवेशन सुरू होत आहे याचीही जाणीव करून दिली. जे करणार असाल तेच बोला आणि जबाबदारीने बोला, इथे आश्वासनं देऊन ती पूर्ण न केल्यास तुमच्यावर हक्कभंगाची कारवाई करण्याची वेळ येऊ देऊ नका. पनवेलकरांनी केलेल्या या आंदोलनाची दखल मी येत्या अधिवेशनात घेणार आहे. याबद्दलच्या सूचना मी माझ्या कार्यालयात देत आहे. हा प्रश्न परिवहन मंत्री, परिवहन सचिव, एसटीचे चेअरमन यांच्या समवेत चर्चेच्या माध्यमातून आणि वैधानिक पातळीवर दोन्ही बाजूचा वापर करीत तातडीने मार्गस्थ व्हावा म्हणुन मी प्रयत्न करणार आहे.

**– आमदार बाळाराम पाटील**

प्रवासी संघांचे हे धरणे आंदोलन आपल्या सगळ्यांच्या सहकार्याने जवळपास यशस्वी झाले आहे. आमच्यासोबत आमदार आणि बाकी सगळ्या पक्षाचे नेते आणि पनवेलकर आहेत. पनवेलकरांच्या सोयीसाठी आजपासून ही सगळी मंडळी कटिबध्द राहणार आहेत. कार्यकारी अभियंता रेडेकर यांनी ८ दिवसाचा वेळ घेतला असून त्यानंतर बैठक घेणार आहेत. यामध्ये काही महत्वाच्या परवानग्या घ्याव्या लागणार आहेत. आमदारांनी मुख्यमंत्र्यांना सांगुन हे काम करून घेतल्यास हा प्रकल्प पूर्ण व्हायला वेळ लागणार नाही असे मला वाटते. राजकीय इच्छाशक्ती आणि शासन आणि प्रशासन यांच्यामध्ये विसंगती आहे का? प्रशासनाच्या बाबतीत जेवढी सत्ताधाऱ्यांची मदत लागते तेवढी मदत होत आहे की नाही हे देखील तपासून बघण्याची गरज आहे. सध्याची परिस्थिती पाहता काम होण्यास विलंब होतो आणि कामांची किंमत वाढते. परिणामी त्याचा भार नागरिकांवर पडतो याचा विचार राज्यकर्त्यांनी केला पाहिजे असे मला वाटते.

**– डॉ.भक्तीकुमार दवे, अध्यक्ष–पनवेल प्रवासी संघ**

एसटीच्या आंदोलनासाठी व्यासपीठावर विविध पक्षाचे आणि संघटनांचे महिला आणि पुरुष पदाधिकारी उपस्थित आहेत त्यामुळे खरेतर हेच या आंदोलनाचे यश म्हणावे लागेल. हा विषय पनवेल प्रवासी संघाचे कार्याध्यक्ष अभिजीत पाटील यांच्याकडून जेंव्हा आमच्याकडे आला त्यावेळेस महाविकास आघाडीचा अध्यक्ष या नात्याने जिल्हा प्रमुख शिरीष घरत, बाळाराम पाटील यांना पत्र दिले. तसेच पनवेलमधील विविध संघटनेचे आणि पक्षाचे नेते एकत्र आले आहेत. पनवेल एस टी स्टँड हे कोकणचे प्रवेशद्वार आहे आणि अश्या महत्वाच्या ठिकाणी अनेक गैरसोयी आहेत. शौचालयाची सोय नाही, विद्यार्थी आणि वयस्कर प्रवाशांसाठी बसण्याची सोय नाही, अश्या अनेक समस्या या बस स्थानकात आहेत. हा प्रश्न पुढे आणला असून त्याला पाठिंबा देण्यासाठी आम्ही सगळे एकत्र आलेलो आहोत.

**– बबनदादा पाटील, संपर्कप्रमुख,**
**(शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे)**

प्रवासी संघाचे अभिजित पाटील, डॉ. दवे यांचे मी अभिनंदन करेन की आपण खरंच लोकांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला. सगळ्या पक्षाच्या नेत्यांना ह्या जनतेच्या प्रश्नासाठी एकत्र आणले. असे प्रश्न उपस्थित करण्याची जबाबदारी आमदार आणि खासदारांची आहे. कारण त्यांना सर्व प्रथम प्रश्न मांडण्याची आणि विकास करण्याची संधी मिळते पण असे न झाल्यास सर्व सामान्य जनता रस्त्यावर उतरते आणि प्रश्न सोडवते आणि ही त्याचीच सुरूवात आहे. पनवेलमध्ये अनेक प्रश्न आहे जसे की महानगर पालिकेचा टॅक्सच्या विषयावर आम्ही महाविकास आघाडीने अनेक बैठका घेतल्या. पूर्वेचे नगरविकास मंत्री आता स्वतः मुख्यमंत्री आहेत तरी देखील तो प्रश्न तसाच आहे. एसटी स्टँडचा प्रश्न सुटला नाही तर मुंबई पुणे एक्स्प्रेस वे जाम करण्याचा निर्णय घ्यावा लागेल त्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. पनवेल एस टी स्टँड होऊन १४ वर्ष झाली परंतु या १४ वर्षात हा प्रश्न सुटला नाही.

**– महेंद्र घरत, काँग्रेस जिल्हाध्यक्ष**

# बकाल नगरांच्या देशा..

वस्तू आणि सेवा कर म्हणजे जीएसटीची जेव्हा निर्मिती झाली, तेव्हा साऱ्यांना या सोप्या कररचनेची भुरळ पडली. करांची दुहेरी तसेच गुंतागुंतीची आकारणी टळणार असल्याने कर कसे कमी होतील, इथपासून महागाई कशी कमी होईल, इथपर्यंत अनेक ठोकताळे बांधण्यात आले. जीएसटीची सुरुवात म्हणजे जणू नवा स्वातंत्र्यदिन असल्याच्या थाटात त्याचा समारंभ झाला. आज जीएसटीचे संकलन सातत्याने नवनवे विक्रम करीत आहे. नुकत्याच संपलेल्या ऑक्टोबर महिन्यात १.५२ लाख कोटी रुपयांचे संकलन झाले आहे. देशाच्या एकूण करसंकलनात जीएसटीने आपले महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. तरीही, अजून त्यात इंधने नाहीत. मात्र, या साऱ्या संकलनाचा किती राज्यांमधल्या किती स्थानिक स्वराज्य संस्थांना लाभ होतो आहे, हा कळीचा प्रश्न आहे. जीएसटी लागू झाल्यानंतर पहिली पाच वर्षे केंद्र सरकारने राज्यांना काही भरपाई देणे अपेक्षित होते. एक जून, २०२२ रोजी ही पाच वर्षे पुरी झाली आहेत. आता राज्य सरकारे छोट्या महापालिका, नगर पालिका, नगर पंचायती यांच्या हद्दीतील विकासांसाठी काय मार्ग शोधून काढणार, हा एक प्रश्नच आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मालमत्ता तसेच इतर करांचे संकलन हा फार मोठा प्रश्न असतो. त्यामुळे, नागरिकांना साध्या साध्या सोयी पालिका व महापालिका देऊ शकत नाहीत. अनेकदा पाणीयोजनांची वीजबिले भरण्यासाठी पैसे नसल्याने पाणी तोडण्याची वेळ अनेक शहरांमध्ये येते. जीएसटी येण्यापूर्वीही परिस्थिती फार बरी नव्हती. मात्र, जकातीसारख्या स्थानिक करांचे हक्काचे उत्पन्न स्थानिक स्वराज्य संस्थांकडे होते. जीएसटी येत असतानाच राज्य सरकारांनी भविष्याचा वेध घेऊन छोट्या व मोठ्या शहरांचा कारभार आपण कसा चालविणार आहोत, याचा भविष्यवेधी आराखडा तयार करण्याची गरज होती. जीएसटीची भरपाई मिळणे बंद झाल्यावर काय काय करवाढ करावी लागेल, याचे सूचन माजी अर्थमंत्री अजित पवार यांनी अनेकदा केले होते. मात्र, हा प्रश्न केवळ नवे कर शोधून काढण्याचा नसून राज्यातील साऱ्याच शहरांचा कारभार, विकास आणि नागरी सोयी यांचा मेळ घालण्याचा आहे. आज केंद्र किंवा राज्य सरकारच्या योजनांची जंत्री पाहिली तर त्यात शेकडो योजना या विविध नावांखाली छोट्या शहरांना, महापालिकांना मिळू शकतात. उदाहरणच द्यायचे तर, अप्रगत सामाजिक वर्गांच्या वस्त्यांमधील रस्ते, सार्वजनिक इमारती बांधण्यापासून विहिरींचे कठडेही बांधण्यापर्यंतच्या योजना राज्य सरकारकडे आहेत. मात्र, अशा योजनांची अंमलबजावणी होत नाही. राज्य सरकारलाही केवळ बजेटमध्ये तरतूद करून प्रत्यक्षात अशा योजनांवरचे पैसे खर्च करायचेच नसतात. मग देशातील सर्वाधिक वेगाने शहरीकरण होणारे राज्य म्हणून आपण टिमकी वाजवत असलो तरी राज्यातील बहुतेक शहरांचे बकालीकरण तसेच सुरू राहते. या प्रक्रियेला ताकदीने हात घालण्याची राजकीय इच्छाशक्ती कोणतेही राज्यकर्ते दाखवत नाहीत. शहरांमधील सार्वजनिक वाहतुकीचा मुद्दा या दृष्टीने पाहण्याजोगा आहे. आज चार-पाच अपवाद सोडले तर एकाही महापालिका किंवा पालिकेची स्वत:च्या ताकदीवर शहर बससेवा चालविण्याची क्षमता नाही. अनेक शहरांमधील बससेवा पूर्वीच एसटीकडे दिली आहे. तिचे एसटीलाही ओझे झाले आहे. मेट्रोच्या गप्पा मारताना छोट्या व मध्यम शहरांमधील नागरिकांची ही गरज सगळे विसरूनच गेले आहेत. याचे मूळ कारण राज्यातल्या नगरपालिका आणि छोट्या महापालिकांना जडलेला धनक्षयाचा विकार हेच आहे. तो कसा दूर करायचा, याचा विचार करण्याची जबाबदारी प्रामुख्याने राज्य सरकारची आहे. त्याचप्रमाणे, डॉ. मनमोहन सिंग सरकारने राबविलेली जवाहरलाल नेहरू शहरी पुनर्निमाण मिशन किंवा मोदी सरकारची स्मार्ट सिटी योजना महाराष्ट्राला कितपत फळली, याचा सडेतोड हिशेब एकदा मांडायला हवा. स्मार्ट सिटी योजना सुरू होऊनही सात वर्षे झाली. महाराष्ट्रातली निवडली गेलेली सात शहरे या काळात किती बदलली? किती योजना पुऱ्या झाल्या? अनेक योजनांचे साधे कार्यादेशही वर्षानुवर्षे रखडले आहेत. आश्चर्य म्हणजे, शहरांमधील ओला कचरा व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीवर केंद्राने आता १२ ऐवजी १८ टक्के जीएसटी लावला आहे. असे केल्यावर जीएसटीचे विक्रम का होणार नाहीत? खरेतर, शहरांमधील कचरा, पाणीपुरवठा, सार्वजनिक आरोग्य आदींच्या सामग्रीवर किंवा सेवांकर जीएसटी लावताच कामा नये. मात्र, पालिकांनी राज्य सरकारच्या तोंडाकडे पाहायचे आणि राज्यांनी केंद्राकडे आशाळभूत नजर लावायची; यातून छोट्या किंवा मोठ्या शहरांचे नष्टचर्य संपणारे नाही. त्यासाठी, नवे अर्थस्रोत शोधणे आणि त्यांचा कल्पक, समन्वित वापर करणे आवश्यक आहे. खरेतर, राज्य सरकारने शहरी महाराष्ट्रासाठी आज असलेल्या यंत्रणांच्या पलीकडे जाऊन नवी व्यवस्था उभारून तिला ताकद देण्याची गरज आहे. नाहीतर, महाराष्ट्राचे बकालीकरण थांबणार नाही.

# पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नोडमध्ये रस्ते दुरूस्तीस सुरूवात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पनवेल, नवीन पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघर या पाचही नोडमध्ये रस्ते दुरूस्तीचे काम युध्दपातळीवर सुरू करण्यात आले आहे. आयुक्त .गणेश देशमुख यांनी पाऊस कमी होताच बांधकाम विभागास रस्ते दुरूस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे येत्या महिन्याभरात ही रस्ते दुरूस्तीची कामे पूर्ण करणार असल्याचे शहर अभियंता संजय जगताप यांनी सांगितले आहे.

विशेष म्हणजे यावेळी या पाचही नोडमधील रस्ते दुरूस्तीची कंत्राटे ही वेगवेगळ्या कंत्राटदारांना दिली आहे. जेणेकरून रस्ते लवकर दुरूस्त होतील व नागरिकांना खड्डेमुक्त रस्ते मिळतील. खारघरमधील काही रस्ते जे सिडकोकडे आधी होते त्या रस्त्याचे पनवेल महापालिकेच्या अभियंत्यानी व सिडकोच्या अभियंत्यानी संयुक्तपणे सर्वेक्षण केले आहे. त्यावरती सिडकोच्या अभियंत्यासोबत महापालिकेने चर्चा केली असून त्यानूसार ज्या रस्त्याचे डीएलपी (डिफेक्ट लायब्लिटी पिरीयड) अजून शिल्लक आहे, तेथील काम सिडकोचे कंत्राटदार करणार असल्याची माहिती शहर अभियंता यांनी दिली आहे.

पनवेल शहरात सध्या आनंद नगरमधील आदर्श हॉटेल ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, जय भारत नाका रस्ते दुरूस्तीचे काम झाले आहे. आग्री समाज हॉल ते गाव देवी मंदिर रस्ता येथील रस्ते दुरूस्तीचे काम सुरू आहे. कामोठे शहरामध्ये खांदेश्वर स्टेशनजवळील परिसर, सेक्टर २५ जवळील अक्षर बिल्डिंगजवळील रस्ते दुरूस्तीचे काम सुरू झाले आहे. खारघरमधील थ्री मंकी पॉंईट ते उत्सव चौक पर्यंतचे रस्ते दूरूस्तीचे काम सूरू आहे. तसेच सेक्टर ४ मधील रस्ते दुरूस्तीचे काम सुरू आहे. कळंबोलीमधील सेक्टर १५ मधील मुख्य रस्त्यांच्या दुरूस्तीस सुरूवात झाली आहे. नवीन पनवेलमधील पोदी येथील रस्ते दुरूस्तीचे काम सुरू करण्यात आले आहे. यावर्षी झालेल्या प्रचंड पाऊसामुळे महापालिका क्षेत्रातील अनेक नोडमधील रस्ते खराब झाले आहेत. या सर्व रस्ता दुरूस्तीच्या कामाची जबाबदारी एका-एका कनिष्ठ अभियंत्याकडे सोपविण्यात आलीआहे. हे कनिष्ठ अभियंते कंत्राटदाराकडून काम लवकर पूर्ण करून घेत आहेत. येत्या महिनाभरात ही रस्ता दुरुस्तीची कामे पूर्ण होणार आहेत.

# आरिवली येथील नागरिकांना दिसला बिबट्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील आरिवली आणि आष्टे गावाच्या मध्ये पाणथळ जागेवर गावातील नागरिकांना बिबट्या दिसून आला आहे. याबाबत वनविभागाचे अधिकारी यांनी जागेवर जाऊन पाहणी केली. बिबट्याच्या दर्शनामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

पनवेल तालुक्यात जंगल मय भाग आहे. त्यामुळे जंगलातून एखादा बिबट्या शिकारीच्या नादात गावांमध्ये येऊ शकतो. आरीवली आणि आष्ट्ये गावाच्या मध्ये असलेल्या तलावाजवळ नागरिकांना बिबट्या दिसून आला. त्यामुळे ग्रामस्थ भयभीत झाले. याची माहिती वनविभागाला देण्यात आली.

गेल्या चार दिवसांपासून बिबट्या दिसत असल्याचे नागरिकांनी सांगितले. वनविभागाने याबाबत स्थळ पाहणी केली आहे व ग्रामपंचायतींना पत्र लिहून नागरिकांना सतर्क करण्याचे आवाहन केले असल्याचे सांगितले. तसेच बॅनर छापून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येणार आहे, असे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# भाजप महिला मोर्चा अध्यक्षा हेमा मानकर यांनी पुकारलेल्या उपोषणा पुढे अखेर प्रशासन नमले



**दै.रायगड नगरी । तळा**

दक्षिण रायगड भाजप महिला मोर्चा अध्यक्षा हेमाताई मानकर यांनी २ नोव्हेंबर रोजी नगरपंचायत समोर उपोषणाला बसल्या होत्या. नगरपंचायतीच्या आवारात १८ऑक्टोबर रोजी महिलेल्या केलेल्या लाथा बुक्कांनी मारहाणीत झाल्या प्रकरणी व नगराध्यक्ष यांचा राजीनामा या प्रमुख मागणीसाठी उपोषणाला बसले होते.

आज तळा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी डॉक्टर धीरज चव्हाण, तळा पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे यांनी उपोषण कर्त्या हेमा मानकर यांना लेखी आश्वासन दिले. यावेळी भाजपा उपजिल्हाध्यक्ष राजेश मपारा तळा तालुका भाजपा अध्यक्ष अॅड निलेश रातवडकर यांच्या समोर उपोषणकर्त्यांनी केलेले मागणीप्रमाणे प्रशासनाने आज लेखी लिहून दिले त्यामुळे दिलेल्या आश्वासनानंतर आज उपोषण दुपारी२ वाजता सिईओ धिरज चव्हाण यांनी थंड पेय देऊन मागे घेण्यात आले.

यावेळी तळा तालुका अध्यक्ष निलेश रातवडकर युवा मोर्चा सरचिटणीस प्रशांत सकपाळ, महिला मोर्चा सरचिटणीस श्रद्धा घाग, जिल्हा सदस्या नंदन नाकते, रोहा तालुका महीला अध्यक्षा जयश्री भांड खेळू वाजे, महादेव आर्डे, हर्षद ठक्कर, वैभव कदम, मंगेश सावंत, भैरव मेहता उपस्थित होते.

## कर्जत नगरपरिषद, कर्जत, जि.रायगड

### जाहीर सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या उक्त ८ (३) अन्वये या नोटीशीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ. | अर्जदाराचे नाव व पत्ता | संदर्भ | झाडाचा प्रकार | झाड तोडण्याचे प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | वैभव विठ्ठल चंद्रावले | ८३२/२२-२३ दि.२२/०४/२०२२ | वड-०१ | रस्ता व गटार बांधकामात अडथळा होत असल्याने |
| २ | अनिल लालजीभाई पटेल | इमारत/सु.बा.१/ कात-१/एस.आर. ५०/२१-२२ अन्वये बांधकाम परवानगी | उंबर-०१, आंबा-०१, जांभूळ-०१, पेरु-०१ | इमारत बांधकामात अडथळा होत असल्याने |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्षा अधिकारी कर्जत नगरपरिषद इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही सूचना हरकती असल्यास ही जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत लेखी स्वरुपात या कार्यलयास कळवावे.

सही/-
**मुख्याधिकारी तथा वृक्षाधिकारी**
**कर्जत नगरपरिषद, कर्जत**

## नावात बदल

माझे जुने नाव वंदना नाना पाटील, असे होते मे. कार्यकारी दंडाधिकारी, पनवेल यांच्या समोर सादर केलेल्या प्रतिज्ञा पत्रानुसार यापुढे मी सौ. वर्षा पंडीत पाटील वय ४९ वर्षे, राहणार श्रीहरी प्लॉट नंबर १५, रोड नंबर २, सेक्टर १२, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड या नावाने ओळखली जाईन.

**सौ. वर्षा पंडीत पाटील** (नवीन नावाने सही/-)

## जाहीर नोटीस

उपविभागीय अधिकारी पनवेल उपविभाग पनवेल यांच्या न्यायालयात

On admission
आरटीएस अपिल क्र....../२०२२

१) श्री.दामोदर महादेव गाताडे
२) हर्षद तुकाराम गाताडे
३) श्री.गणेश पांडुरंग गाताडे
दोघे रा.मौजे दापिवली, ता.पनवेल — वादी

विरुद्ध

कै.नामदेव धर्मा गाताडे (मयत) तर्फे वारस
१) जोमी नामदेव गाताडे
२) सुलोचना म्हात्रे
दोघेही रा.दापिवली, ता.पनवेल — प्रतिवादी

तमाम जनतेस तसेच सामनेवाले यांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार मौजे : दापिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील फेरफार नोंद क्र.१७९, २३२, २५० विरुद्ध अर्जदार यांनी या न्यायालयात प्रस्तुतचे अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीकामी सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची सुनावणी ही दि.१७/११/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांनी तसेच वरील जमीन मिळकतीशी संबंधित असलेल्या व्यक्तींनी २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यासह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : दापिवली, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| ४५ | ७ | १.११.० | ७.१५ |
| ४५ | ६ | ०.२२.५० | ३.२० |
| ४५ | ५ | ०.२२.५० | ४.२१ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

ठिकाण : पनवेल
दि.२०/१०/२०२२

सही/-
**उपविभागीय अधिकारी पनवेल**
**उपविभाग पनवेल**

मे.सोनावणे सो

प्रो.जमा.२-२५

अर्जदाराचे वकील
अॅड.श्रृती द. शिंदे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१४१५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०७/१२/२०२२

कै.शंकर रघुनाथ जाधव तर्फे वारस
१) श्रीमती.सुभद्रा शंकर जाधव
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.संदीप शंकर जाधव
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.ज्ञानदेव शंकर जाधव
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.वैभव शंकर जाधव
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.प्लॉट नं.२३, मातोश्री को.ऑप.हौसिंग सोसायटी, सेक्टर १३, रुम नं.१५, कळंबोली नोड, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.शंकर रघुनाथ जाधव हे दि.२३/०३/२०२१ रोजी मौजे : सोनेवडी बु.ता.फलटण, जि.सातारा येथे त्यांचा मृत्यू झालेले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**प्लॉट नं.२३, मातोश्री को.ऑप.हौसिंग सोसायटी, सेक्टर १३, रुम नं.१५, कळंबोली नोड, जि.रायगड. क्षेत्र २८.०० चौरस फुट**

कै.शंकर रघुनाथ जाधव यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार क्र.१ ते ४ हेच वारस आहेत. सदर वरसां व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३१/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/- **क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** (कोर्टाचा शिक्का) सही/- **सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

अॅड.प्रज्ञा सरवणकर

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२०६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२/०१/२०२३

श्रीमती.ललिता सहदेव म्हात्रे व इतर — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.सहदेव नारायण म्हात्रे रा.मौजे : रांजणपाडा, ता.उरण, जि.रायगड येथे अल्पशा अजाराने दि.१६/०९/२०१० रोजी पनवेल नगरपरिषद हॉस्पिटल पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच कै.सहदेव नारायण म्हात्रे यांची आई श्रीमती.गंगुबाई नारायण म्हात्रे यांचे दि.२२/०९/१९८९ रोजी मौजे : रांजणपाडा, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झालेले आहे. अर्जदार क्र.१) श्रीमती.ललिता सहदेव म्हात्रे रा.रांजणपाडा, ता.उरण, जि.रायगड २) श्रीमती.निलम सहदेव म्हात्रे रा.खोपटे, ता.उरण, जि.रायगड ३) सौ. कविता संदीप कडू रा.सोनारी, ता.उरण, जि.रायगड ४) सौ.दर्शना रोशन पाटील रा.वेश्वी, तालुका : उरण, जि.रायगड ५) सौ.भाग्यश्री मिलींद गावंड, रा.सावरखार, ता.उरण, जि.रायगड

**मिळकतीचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| २५२/जासई | २३५ | ६ | ०-३-० |
| ४०/पौंडखार | १६ | ११ | ०-२३-० |
| १२७/जासई | १५ | १३ | ०-१८-० |
| | २४ | ५ | ०-१५-४ |
| १२७/जासई | २४ | २ | ०-१९-५ |

सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार व हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

उरण
दि.२/११/२०२२

सही/- **क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण** (कोर्टाचा शिक्का) सही/- **सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.कॉलिटी इन्फ्रा तर्फे प्रो.प्रा.श्री.नौमान नूर अहमद पटेल, पत्ता : शॉप नं.५, फ्रोरा बिल्डींग, प्लॉट नं.१३४, सेक्टर-१०, तळोजा फेस-१, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०८ यांनी मुळ मालक १) श्री.श्रीपत माहादू पाटील २) श्रीमती.गुनाबाई माहादू पाटील, ३) कै.धर्मा सुदाम पाटील (मयत) चे वारस अ) श्रीमती.मनुबाई धर्मा पाटील ब) सौ.माईबाई देवराम मयेकर, रा.कोपरा गांव, पनवेल क) श्री.अभिमन्यू धर्मा पाटील, ड) सौ.वत्सला वासुदेव पाटील, रा.पेंधर गांव, तळोजा, इ) सौ.रंजना धर्मा पाटील, रा.मुर्बी गांव, खारघर, ई) कु.संजय धर्मा पाटील उ) सौ.अंजनी गुरुदास राजे, रा.तळोजा मजकूर, पनवेल ४) कै.पदीबाई बबल्या पाटील, अ) हरी बबल्या पाटील सर्व रा.मुर्बी, ता.पनवेल, जि.रायगड ब) श्रीमती.सावित्रीबाई भुराजी राजे रा.तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड क) श्रीमती.रंजीता राम पाटील रा.मुर्बी, ता.पनवेल, जि.रायगड ड) करिश्मा राम पाटील उर्फ सौ.करिश्मा योगेश म्हात्रे, रा.कामोठे, पनवेल, इ) श्री.अतुल राम पाटील, रा.मुर्बी, खारघर, ई) स्वेता राम पाटील उर्फ सौ.स्वेता विकास भोपी रा.रिटघर, मोर्बे, उ) श्री.साजेश राम पाटील रा.मुर्बी, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड त्यांच्या मालकीची मिळकत सिडकोने १२.५ टक्के योजनेंतर्गत संपादीत करण्यात आलेली असून सदरहू संपादनापोटी खालील भूखंड मिळालेला असून सदरहू भूखंड आमचे अशिल हे सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरीत करून घेणार आहेत. सदरहू भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**सिडको फाईल नं.१००४/ तळोजा फेस-२**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | १८ | १० | १७४४.९६ चौ.मी. |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे
दि.३/११/२०२२

सही/-
**अॅड.रेखा कि. होवाळे**
**शॉप नं.१३, सेक्टर १ ए, प्रभात सेंटर, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**मो.नं.९८१९६३०६३२**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रक्तस्त्रावामुळे ४५ वर्षे इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

छोटा ट्रॅक्टर चालवत असताना रोटरमध्ये पाय अडकून झालेल्या रक्तस्त्रावात एका ४५ वर्षीय इसमाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

धोदानी येथील कमळ्या हिरू घुटे हे पिंपळवाडी येथील सेरेनेटी फार्म हाऊस मध्ये छोटा ट्रॅक्टर चालवत होते.

यावेळी टर्न मारताना रोटर मध्ये त्यांचा पाय अडकला. यात कमळ्या जखमी झाले व मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. त्यांना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दाखल करण्यात आले. मात्र तेथे त्यांचा मृत्यू झाला.




कु.अक्षय सुनील पेठे

यांला वाढदिवसानिमित्त

४ नोव्हेंबर

हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक : आई-वडील व भाऊ,
बहिण आणि पेठे परिवार


### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.शशिकांत लक्ष्मण कोळी सज्ञान भारतीय रहिवासी पत्ता : रुम नं.५३९/००२, फणसपाडा, गावदेवी मंदिर जवळ, सेक्टर १९/२०, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ हे श्री.पांडुरंग रामजी दमडे सज्ञान भारतीय रहिवासी पत्ता : घर क्र.२३, भंगारपाडा, कुंडेवहाळ, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ यांचेकडून ५०% असे करारनाम्याद्वारे हस्तांतरण करून घेत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**तालुका : पनवेल, जि.रायगड येथे**

| गावाचे नाव | भूखंड क्रमांक | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे | १९२ एफ | २३ | १४९.८२ चौ.मी. (५०%) |

कोणाही व्यक्ती / व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थांचे भूखंड संदर्भात, कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षिस, भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन, किंवा इतर काही असलेस ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत कागदपत्रासोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे.

दि.३/११/२०२२

सही/-
**ॲड.रेखा कि. होवाळे**
**शॉप नं.१३, सेक्टर १ ए, प्रभात सेंटर, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**मो.नं.९८१९६३०६३२**

मा.गोडसे सो
अर्जदारातर्फे वकील श्रीमती.पुजा धंदुकिया

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५१९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१२/१२/२०२२

१) श्रीमती.पुजा देवेंद्र सोनावणे
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : व्यवसाय
२) कु.गौरी देवेंद्र सोनावणे
वय : ९ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
दोघे रा.फ्लॅट नं.१२, पुष्कराज को.हौ.सोसायटी,
प्लॉट नं.अे-२४/अे, सेक्टर-१२,
खारघर-४१०२१० अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी कै.देवेंद्र बळवंत सोनावणे हे मौजे फ्लॅट नं.१२, पुष्कराज को. हौ.सोसायटी, प्लॉट नं-ए २४/अे, सेक्टर-१२, खारघर-४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड दि.२०/१२/२०२१ येथे मयत झाले आहेत. ज्याअर्थी अर्जार क्रं.१ व २ यांनी ते कै.देवेंद्र बळवंत सोनावणे यांचे खालील वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट नं.१२, पुष्कराज को.हौ.सोसायटी, प्लॉट नं.अे-२४/अे, सेक्टर-१२, खारघर-४१०२१०, ता.पनवेल, जि.रायगड.**
**एकूण क्षेत्रफळ ३५ चौ.मी.**

वरील अर्जदार क्रं.१ आणि २ हे मयत कै.देवेंद्र बळवंत सोनावणे यांचे वारसदार आहेत या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून या कोर्टात एक महिन्याच्या आत हजर राहून हरकत घ्यावयाची आहे. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याआधी योग्य ती हरकत घेतली नाही तर हे मे.कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेण्यासाठी शाबित झाल्यास त्यास वारसदाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि.०३/११/२०२२ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

## मृत ब्लु व्हेल माशाची समुद्रात वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी लावली विल्हेवाट

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जागतिक ख्यातीच्या घारापुरी बंदराच्या किनाऱ्यावर ३० फूट लांबीचा मृत ब्लु व्हेल मासा सापडला. वनविभागाने या माश्याची नोंद करून, स्थानिक बोटींच्या साहाय्याने मुंबई-बेलापूर समुद्र प्रवाहात सोडल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी एन. एम. कोकरे यांनी दिली. मात्र अ श्रेणीमध्ये मोडणाऱ्या या माशाची वनखात्याकडून अशा प्रकारे विल्हेवाट लावण्यात येणार असेल तर या घटनेची चौकशी करण्यात यावी अशी मागणी सर्व सामान्य नागरिक,प्राणी मित्र करत आहेत.

सविस्तर माहिती अशी की उरण तालुक्यातील जागतिक ख्यातीच्या घारापुरी बंदराच्या किनाऱ्यावर ३० फूट लांबीचा मृत ब्लु व्हेल मासा सापडला होता. वनविभागाने या माश्याची नोंद करून, स्थानिक बोटींच्या साहाय्याने मुंबई-बेलापूर समुद्राच्या प्रवाहात सोडल्याची माहिती खुद्द उरण वनपरिक्षेत्र अधिकारी एन. एम. कोकरे यांनी दिली होती. मात्र अ श्रेणीमध्ये मोडणाऱ्या या माशाची वनखात्याकडून विल्हेवाट लावण्याची आवश्यकता असताना, या माशाला समुद्र प्रवाहात सोडून हात वर केल्याने वनखात्या बाबत सध्या नाराजी सुर उमटत आहे.एकदंरीत ब्लु व्हेल (शार्क) या मूत्यू माशांची विल्हेवाट ही एखाद्या ठिकाणी खड्डा करुन किंवा जळती करुन लावणे गरजेचे असताना वन विभागाकडून सदर मुत्यू माशांची विल्हेवाट पुन्हा समुद्राच्या पाण्यात सोडून करण्यात येणार असेल तर या घटनेची राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सदर घटनेची माहिती घेऊन सखोल चौकशी करावी अशी मागणी आता सर्व सामान्य नागरिक, प्राणी मित्र करत आहेत

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही श्री.अगस्ट्रीन जॉन रॉडीक्स व इतर १ यांचे नांवे आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : आष्टे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| श्री.अगस्ट्रीन जॉन रॉडीक्स व इतर १ | ३७/० | ०-८०-२ पैकी ०-४०-० | १५-३१ |

मौजे आष्टे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार श्री.अगस्ट्रीन जॉन रॉडीक्स इतर १ यांचे वरील नमूद शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

वर नमूद मिळकत माझे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकरचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०३/११/२०२२

सही/-
**ॲड.गणेश एन. भोगाडे**
**तळमजला, शॉप नं.३०, राजे कमर्शिअल कॉम्प्लेक्स, शिवाजी महाराज चौक, पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९३२४७२७४४६**

मे.सोनावणे साहेब कोर्ट
प्रोसेस फी ५०/- जमा
अर्जदारांचे वकील
ॲड.रश्मी बळीराम जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३६७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१/१२/२०२२

कै.मोहम्मद सलीम उस्मान राईन
यांचे वारसातर्फे
१) श्रीमती.कहेकशा बानो सलीम राईन
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी अर्जदार क्र.१
२) सलोमी सलीम राईन
वय : २८ वर्षे, धंदा : गृहिणी अर्जदार क्र.२
३) मोहम्मद तौसीफ सलीम राईन
वय : २४ वर्षे, धंदा : अर्जदार क्र.३
४) सानिया सलीम राईन
वय : १८ वर्षे, धंदा : अर्जदार क्र.४
सर्व रा.फ्लॅट नं.४०२, बी-विंग, खैरुनबी
बिल्डींग, न्यू अनासागर को.ऑ.हौ.सोसा.लिंक
रोड, साकीनाका, मुंबई-४०००७२
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ (पती) व अर्जदार क्र.४ (वडील) यांचे कै.मोहम्मद सलीम उस्मान राईन हे दि.०४/०७/२०२० रोजी फ्लॅट नं.४०२, बी-विंग, खैरुनबी बिल्डींग, न्यू अनासागर को.ऑ.हौ.सोसा. लिंक रोड, साकीनाका, मुंबई-४०००७२ येथे मयत झाले आहेत.

कै.मोहम्मद सलीम उस्मान राईन यांचे मालकीच्या मौजे : पालेखुर्द, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहेत :-

**मौजे : पालेखुर्द, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्र./सर्व्हे नं. | उपविभाग | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| ४१ | १/क/१ | ०-२२-० | २.२५ |

वरील मिळकतीबाबत कै.मोहम्मद सलीम उस्मान राईन यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळविण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टास अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखल्याचे कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत मे.कोर्टात दाखल कराव्यात.

मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.३/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा यांच्यावतीने नगरपरिषद प्रशासनास निवेदन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत नगरपरिषद हद्दीत डेंग्यू चे रुग्ण मोठया प्रमाणात आढळत आहेत, याबाबत उपाय योजना करावी म्हणून भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा यांच्यावतीने नगरपरिषद प्रशासनास निवेदन देण्यात आले आहे.



मुख्याधिकारी वैभव गारवे यांची कर्जत युवा मोर्चा चिटणीस सर्वेश गोगटे, बिराज पाटकर,सलमान शेख,दर्पण घारे,फैजान पटेल यांनी भेट घेवून निवेदन सादर केले. नगरपरिषद प्रशासनास दिलेल्या निवेदनात कर्जत मध्ये डेंग्यूचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे. विठ्ठलनगर परिसरात गेल्या दोन दिवसात ४ ते ५ जणांना ॲडमिट करावे लागले आहे. आणि अजुन काही लोकांना लक्षणे दिसत आहेत. म्हणुन तातडीने विठ्ठलनगर तसेच संपूर्ण नगरपरिषद हद्दीत जंतूनाशक फवारणी करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पूर्वीच्या एलपीजी रिकव्हरी प्लांटच्या ठिकाणी गेल (इंडिया) लिमिटेड, उसर येथे ५०० केटीए उत्पादन क्षमतेच्या नवीन पीडीएच पीपी प्रकल्पाचे बांधकाम सुरू झाले आहे. गेल (इंडिया) लिमिटेडने कंपनीच्या सीईआर/सीएसआर कार्यक्रमांतर्गत चांगल्या आरोग्याची सामाजिक जबाबदारी म्हणून या प्रकल्पाच्या आजूबाजूच्या गावातील लोकांना मोफत मूलभूत आरोग्य सेवांसह वोक्हार्ट फाऊंडेशनची मोबाईल क्लिनिक रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे. या रुग्णवाहिकेत एक एमबीबीएस डॉक्टर, एक नर्स, एक फार्मासिस्ट आणि औषधे या सुविधा उपलब्ध असतील. ही फिरती दवाखाना रुग्णवाहिका दररोज गावोगावी फिरून गावातील लोकांना वैद्यकीय सेवा पुरविणार आहे. या मोबाईल क्लिनिक रुग्णवाहिकेचे लोकार्पण आज दि.३ नोव्हेंबर २०२२ रोजी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग येथे संपन्न झाले.

यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, अलिबाग तहसिलदार मीनल दळवी, मुख्य महाव्यवस्थापक व प्रभारी अधिकारी श्री.अनूप गुप्ता, महाव्यवस्थापक (पीडीएच पीपी प्रकल्प) श्री.वीरेंद्र कुमार, महाव्यवस्थापक (पीडीएच पीपी प्रकल्प) श्री.एम.काशिवेलराजन, महाव्यवस्थापक (एचआर) श्री.जितिन सक्सेना आणि गेल कंपनीचे इतर अधिकारी यावेळी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी गेल कंपनीचे व उपस्थित सर्व अधिकाऱ्यांचे कौतुक केले तसेच गेल कंपनीच्या आजूबाजूच्या गावा-तील जास्तीत जास्त लोकांनी या मोबाईल क्लिनिक रुग्णवाहिकेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस जाहीर कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल नामे श्री.सुरेश चंद्रा उडेलालजी गुर्जर, पत्ता : लापती, सालारे, नाथद्वारा राजसमद, राजस्थान ३१३३०१ यांनी खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकतीबाबत सौ.रेखा केसरवानी, पत्ता : ४०५, फायर गार्डन, आझान लेन, अंधेरी, मुंबई ४०००५८, यांचे बरोबर दि.२९/१०/२०२२ रोजी भूखंड विक्री करार केलेला आहे व सदर मिळकत त्रिपक्षीय करारनाम्याने हस्तांतरीत करून घेत आहे.

तरी सदर मिळकती संबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क, वारस हितसंबंध, गहाण, ताबा, दान, बक्षिस, पोटगी, विक्री, विश्वस्त, कुळ, वहिवाट, ॲटेचमेंट इ. अगर अन्य कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खलील सही करणार यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे दिलेल्या पत्यावर समक्ष येवून भेटावे जर अशी लेखी खबर अथवा हरकत सर मुदतीत न आल्यास सदर मिळकतीवर कोणचाही कसल्याही प्रकारचा हक्क, अधिकार अथवा हितसंबंध नाही अगर तसा असल्यास त्याने सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहारा पुरा करतील हे सर्वांस कळावे व त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व त्यास आमचे अशिल जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| तळोजा पाचनंद | १७ | ४१ | ५० |

दि.३१/१०/२०२२
नवी मुंबई

सही/-
**ॲड.देवेंद्र भिका पाटील**
**शॉप नं.१, श्रीजी सोहम, सी.एच.एस.लि., भूखंड क्रं.७६, सेक्टर २१, उलवे, नवी मुंबई-४१०२०६**

मे.सोनावणे सो
ॲड.देवेंद्र टिळक

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१५०२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१९/१२/२०२२

१) श्री.परेश प्रभाकर माने
वय : ३६ वर्षे, व्यव : नोकरी
२) श्रीमती.उज्वला प्रभाकर माने
वय : ६२ वर्षे, व्यव : गृहिणी
३) श्री.निखील प्रभाकर माने
वय : ३३ वर्षे, व्यव : नोकरी
४) शर्मिला प्रभाकर माने उर्फ
सौ.शर्मिला समीर बोंडकर
वय : ३९ वर्षे, व्यव : नोकरी
अर्जदार नं.१ ते ४ रा.हेमदी रेसिडेन्सी,
बी-००१, प्लॉट नं.३ ए, सेक्टर-११,
कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार क्र.२ यांचे पती व अर्जदार क्र.१, ३, ४ यांचे वडील कै.प्रभाकर भागुराम माने यांचा मृत्यू दि.०५/०४/२०१९ रोजी रा.हेमदी रेसिडेन्सी, बी-००१, प्लॉट नं.३ ए, सेक्टर-११, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. ते हयात असताना त्यांच्या नावे खालील वर्णनाच्या जमीन मिळकत होती व आहे. सदरहू जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट नं.डी १, तळमजला, बिल्डींग नं.४,**
**स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स, सर्व्हे नं.४१, हिस्सा नं.0**
**व्हिलेज शिलोत्तर रायचुर, ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती ही कै.प्रभाकर भागुराम माने यांच्या नावे असून ते दि.०५/०४/२०१९ रोजी मयत झालेले आहे. अर्जदार हे वरील जमीन मिळकतीमधील त्यांचा हिस्सा पुरता वारसदाखला मिळण्यासाठी सदरचा दिवाणी चौकशी अर्ज दाखल केल आहे.

वरील अर्जदार हे कै.प्रभाकर भागुराम माने यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना.कोर्टात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन ना.कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मे.सोनावणे साहेब कोर्ट
प्रोसेस फी ५०/- जमा
अर्जदारांचे वकील
ॲड.रश्मी बळीराम जाधव

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५६४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१२/१२/२०२२

१) श्री.अशोक टिकामल तनेजा
वय : ७४ वर्षे, धंदा : व्यवसाय
प्लॉट नं.९, पाडवी हौसिंग सोसायटी,
साक्री, धुळे अर्जदार क्र.१
२) श्री.ओमप्रकाश सेवाराम तनेजा
वय : ७५ वर्षे, धंदा : व्यवसाय
ई/२, कुमार नगर, साक्री रोड, धुळे अर्जदार क्र.२
३) श्री.नानकचंद प्यारेलाल तनेजा
वय : ७८ वर्षे, धंदा : व्यवसाय अर्जदार क्र.३
४) श्री.अर्जुनकुमार प्यारेलाल तनेजा
वय : ७५ वर्षे, धंदा : व्यवसाय
सर्व रा.प्लॉट नं.९, पाडवी हौसिंग सोसायटी,
साक्री, धुळे अर्जदार क्र.४
सर्व रा.फ्लॅट नं.४०२, बी विंग, खैरुनबी
बिल्डींग, न्यू अनासागर को.ऑ.हौ.सोसा.लिंक
रोड, साकीनाका, मुंबई-४०००७२
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) अर्जदार क्र.१ यांचे कै.टिकामल बुटामल तनेजा (वडील) व कै.सदोरीबाई टिकामल तनेजा (आई) असून सबब सदर अर्जदार क्र.१ (मुलगा) हे अर्जातील शिर्षकात नमूद पत्यावर कायमस्वरुपी राहतात.

२) अर्जदार क्र.२ यांचे कै.सेवाराम बुटामल तनेजा (वडील) व कै.द्वारकाबाई सेवाराम तनेजा (आई) असून सबब सदर अर्जदार क्र.२ (मुलगा) हे अर्जातील शिर्षकात नमूद पत्यावर कायमस्वरुपी राहतात.

३) अर्जदार क्र.३ यांचे कै.भिमसेन बुटामल तनेजा (स्वतः), कै. सितादेवी भिमसेन तनेजा (पत्नी), कै.महेंद्र भिमसेन तनेजा (मुलगा), कै.जितेंद्र भिमसेन तनेजा (मुलगा) असून सबब सर्व मयत असून वारसदार कोणीही मयत नाहीत.

४) अर्जदार क्र.४ व ५ यांचे कै.प्यारेलाल बुटामल तनेजा (वडील), कै.देवकीबाई प्यारेलाल तनेजा (आई) असून सबब सदर अर्जदार क्र.४ व ५ (मुलगे) हे अर्जातील शिर्षकात नमूद पत्यावर कायमस्वरुपी राहतात.

५) अर्जदार क्र.१ यांचे कै.टिकामल बुटामल तनेजा (वडील) हे दि.१४/०७/१९९७ रोजी धुळे, येथे मयत झाले आहेत. कै.सदोरीबाई टिकामल तनेजा (आई) ही दि.३१/१०/२०१० रोजी, धुळे येथे मयत झाले ओहत.

६) अर्जदार क्र.२ कै.सेवाराम बुटामल तनेजा (वडील) हे दि.२१/१२/१९८४ रोजी धुळे येथे मयत झाले आहेत. कै.द्वारकाबाई सेवाराम तनेजा (आई) हे दि.२८/०२/२००५ रोजी धुळे येथे मयत झाले आहेत.

७) अर्जदार क्र.३ कै.भिमसेन बुटाला तनेजा (स्वतः) दिनांक २७/०९/१९९२ रोजी धुळे येथे मयत झाले आहेत. कै.सितादेवी भिमसेन तनेजा (पत्नी) दि.१९/१२/१९८७ रोजी धुळे येथे मयत झाले आहेत. कै.महेंद्र भिमसेन तनेजा (मुलगा) दि.११/०४/२०१३ रोजी धुळे येथे मयत झाले आहेत. कै.जितेंद्र भिमसेन तनेजा (मुलगा) दि.७/०५/२०१२ रोजी धुळे येथे मयत झाले आहेत.

८) अर्जदार क्र.४ कै.प्यारेलाल बुटामल तनेजा (वडील) यांचे दि.१०/९/८० रोजी धुळे येथे मयत झले आहेत. कै.देवीबाई प्यारेलाल तनेजा (आई) दि.०१/११/१९८४ रोजी धुळे येथे मयत झाले आहेत.

१) कै.टिकामल बुटामल तनेजा २) कै.सेवाराम बुटामल तनेजा, ३) कै.भिमसेन बुटामल तनेजा, ४) कै.प्यारेलाल बुटामल तनेजा यांचे मालकीच्या मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहेत :-

**मौजे : खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्र./सर्व्हे नं. | उपविभाग | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| ४६३ | ५ | २-१८-६ पो.ख. १-४०-६ एकूण ३-५९-२ | ८.०६ |

वरील मिळकतीबाबत १) कै.टिकामल बुटामल तनेजा २) कै. सेवाराम बुटामल तनेजा, ३) कै.भिमसेन बुटामल तनेजा, ४) कै. प्यारेलाल बुटामल तनेजा यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळविण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टास अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखल्याचे कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत मे.कोर्टात दाखल कराव्यात.

मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०३/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## संक्षिप्त...

# चिरनेर येथे महाबीजच्या भात पिकांची पाहणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील मौजे चिरनेर येथील शेतकऱ्यांना महाबीज बियाणे उत्पादक संस्थेकडून ग्राम उत्पादन योजनेअंतर्गत जया या भात पिक वाणाचे पायाभूत बियाणे उपलब्ध करून देण्यात आले होते. दरम्यान सदर महाबीज भात पिकांची पाहणी १८ ऑक्टोबर २०२२ रोजी, महाबीजचे विभागीय बीज प्रमाणीकरण बीज परीक्षक अधिकारी श्री. डीसोझा आणि श्री तांदळे तसेच महाबीज अधिकारी सचिन पाटील त्याचबरोबर राज्य शासनाच्या उरण तालुका कृषी विभागाचे तालुका कृषी अधिकारी विश्वनाथ ढवळ, कृषी सहाय्यक निखिल देशमुख, सुरज घरत व प्रफुल्ल खारपाटील या सर्वांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन, प्रत्यक्ष भात पिकांची पाहणी केली.

या पाहणी दौऱ्यात महाबीज बियाण्यांच्या वापराबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यात वाटप करण्यात आलेल्या जया या पायाभूत महाबीज बियाण्यांच्या लागवडीतून, शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादनातील फरकाचा अभ्यास करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनीही त्यांचा अनुभव कथन केला. यावेळी भाताला आलेले फुटवे, कणसाच्या लोंब्या व दाण्यांची संख्या आदी बाबत चर्चा करून, परीक्षण करण्यात आले.

तर भात पीक तयार झाल्यानंतर महाबीज कंपनी, शेतकऱ्यांना सरकारी हमीभावापेक्षा २० टक्के जादा दर देऊन, हे महाबीजचे भात बियाणे खरेदी करणार असल्याची माहितीही महाबीजचे विभागीय बीज प्रमाणीकरण अधिकारी श्री डीसोझा व श्री तांदळे यांनी दिली. सदर बिजोत्पादनाचा कार्यक्रम राबविण्यासाठी चिरनेर येथील श्री महागणपती सेंद्रिय शेतकरी गटाचे अध्यक्ष प्रफुल्ल खारपाटील यांनी चिरनेर परिसरातील शेतकऱ्यांना प्रोत्साहित करून,मेहनत घेतली.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# लोको पायलटच्या सतर्कतेमुळे माथेरान मिनी ट्रेनचा अपघात टळला

**दै.रायगड नगरी । माथेरान**

नेरळ माथेरान मिनी ट्रेन सुरु झाल्यानंतर त्यास पर्यटकांचा भरभरभरून प्रतिसाद मिळत आहे ह्या मार्गावर धावणाऱ्या गाड्या नेहमीच फुल्ल होत आहेत त्यामुळे पर्यटक थेट माथेरान शहरात येत असल्याने काही जणांच्या पोटात दुखु लागले असून ही सेवा बंद राहावी ह्या उद्देशाने अनेक प्रयत्न सुरू आहेत त्यातच काल नेरळ माथेरान मार्गावर गाडी येणाच्या वेळी ह्या मार्गावर लोखंडी पोल टाकून ठेवण्यात आला होता पण लोको पायलट च्या सतर्कतेमुळे हा अपघात टळला.

माथेरान मिनी ट्रेनच्या मार्गात अज्ञातांनी लोखंडी रॉड (रूळाचा तुकडा) ठेवून ट्रेनचा मार्ग अडवण्याचा प्रयत्न केला, दरम्यान हा अज्ञाताकडून ट्रेनचा घातपात घडवून आणण्याचा प्रयत्न होता की पर्यटकांनी केलेली मस्ती? याबाबत आता शोध सुरू असून येथील लोको पायलटच्या सतर्कतेमुळे माथेरान मिनी ट्रेनचा अपघात होता टळला.

तीन वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर आपल्या मार्गातील अनेक अडथळे दूर करीत नुकतीच नेरळ माथेरान नेरळ अशी माथेरान टॉय ट्रेन सह्याद्रीच्या पर्वत रांगेतून प्रवासी पर्यटकांच्या सेवेत सुरू झाली. मात्र काल विकेंड रविवार सायंकाळी माथेरान स्थानकातून नेरळच्या दिशेने सुटलेली ट्रेन ही वॉटर पाईप च्या १४० क्रमांकाच्या दरम्यानच्या मार्गावर साडे पाच वाजण्याच्या सुमारास आली असता येथे रेल्वे रुळावर कोणी अज्ञातांनी लोखंडी रॉड ठेवले होते. वेळीच लोको पायलट दिपचंद (डीसी) मीना आणि अल्प सुधांशू यांना हे दिसून आल्याने ट्रेन थांबविण्यात आल्याने पुढील मोठा अनर्थ होता टळला. दरम्यान यावेळी दोन ठिकाणी अज्ञाताकडून रेल्वे रुळाच्या मार्गात कोणी अज्ञातांनी लोखंडी रॉड ठेवल्याने हा अपघात घडवून आणण्यासाठी केलेला प्रयत्न होता की येथे फिरण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची मस्ती होती याबाबत आता अधिक तपास जीआर पी चे रेल्वे पोलीस हे करीत असून अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला. नेरळ माथेरान मिनी ट्रेन सुरू झाल्यापासून या ट्रेनला पर्यटकांचा जोरदार प्रतिसाद लाभत असून आत्तापर्यंत तब्बल साडे तीन हजाराहून अधिक पर्यटकांनी या सफरीचा लाभ घेतला असून फक्त दोन गाड्या सध्या सुरु असल्या तरीही रेल्वे प्रशासनाला तब्बल साडेपाच लाखाहून अधिक महसूल या ट्रेनने मिळून दिला आहे. या ट्रेनने पर्यटक थेट माथेरान शहरांमध्ये येत असल्याने पर्यटकांचे पैसेही वाचतात व थेट शरद आल्यामुळे फसवणुकीलाही सामोरे जावे लागत नाही परंतु हीच बाब काही माथेरान विरोधी व्यावसायिकांना खटकत असल्याने त्यांनीच तर हा प्रकार केला नाही अशी चर्चा मात्र रंगत असून जर का असं प्रकार असेल तर संबंधितावर कठोर कारवाई व्हावी असे माथेरान मधील नागरिकांचे म्हणणे आहे



# धुतम येथे प्राथमिक शाळेच्या नव्याने बांधण्यात आलेल्या ४ वर्ग खोल्यांचे उदघाटन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील धुतुम गावा–तील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या इमारतीच्या पहिल्या मजल्याच्या विस्ताराचे काम करण्यात आले. जिल्हा परिषद रायगड यांनी विहित केलेल्या निविदा प्रक्रियेनुसार धुतुम ग्रामपंचायती मार्फत कामाचे वाटप करण्यात आले असून,पहिल्या मजल्यावर एकूण चार वर्ग खोल्या बांधल्या आहेत. एकूण ३५ लाख रुपये खर्चातून बांधण्यात आलेल्या या खोल्यांचे उदघाटन उरणचे आ. महेश बालदी यांच्या हस्ते व उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.



आ. महेश बालदी यांनी धुतम ग्रामपंचायतीने आयओटीएल कंपनीकडून सीएसआर निधी आणून गावासाठी चांगले प्रकल्प विकसित केल्याबद्दल सरपंच रेश्मा ठाकूर , उपसरपंच शरद ठाकूर आणि ग्रामपंचायतीचे सदस्य आणि ग्रामविकास अधिकारी व्ही. आर. म्हात्रे आणि त्यांच्या टीमचे कौतुक केले. ओपन जिम, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, वॉटर एटीएम इत्यादी प्रकल्पांसाठी आयओटीएल व्यवस्थापनाने धुतुम ग्रामपंचायतीला दिलेला संपूर्ण पाठिंबा आणि सीएसआर अंतर्गत आजूबाजूच्या सर्व गावांना दिलेल्या समर्थनासाठी आयओटीएल व्यवस्थापनाचे कौतुक केले. या ३५ लाखांच्या ४ वर्ग खोल्यांच्या निर्मितीसाठी आयओटीएल कंपनीने ३० लाखांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. तर उर्वरित ५ लाख रुपये निधी सीबर्ड मरीन सर्व्हिसेस प्रा.लि. या कंपनीने उचलला आहे.यावेळी आयओटीएलचे नवीन चंद्र, संयुक्त अध्यक्ष एचआर, . अतुल खराटे, उपाध्यक्ष कॉर्पोरेट संबंध, भूपेश शर्मा, नवघर टर्मिनलचे टर्मिनल इन्चार्ज, शिशिर कुमार जीएम प्रशासन आणि सीएसआर, मिलिंद मोघे सल्लागार आय.आर आणि आयओटीएल नवघर टर्मिनलचे इतर अधिकारी उपस्थित होते.

तर अतुल खराटे यांनी सरपंच व उपसरपंच यांनी धुतूम च्या विकासात्मक कामांसाठी केलेल्या समर्पणाचे कौतुक केले. आपल्या भाषणात त्यांनी आतापर्यंत केलेल्या प्रकल्पांच्या दीर्घकाळ टिकाव धरण्यासाठी त्यांच्या कामगिरीवर लक्ष ठेवण्याची सूचना केली. धुतुम ग्रामस्थांसाठी उपयुक्त प्रकल्पांसाठी आयओटीएल व्यवस्थापनाच्या वतीने भविष्यात ग्रामपंचायतीला सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

# कामोठेकर अग्निशमन केंद्राच्या प्रतीक्षेत : स्वतंत्र अग्निशमन केंद्र मिळणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२ लाखाहून अधिक लोकवस्ती असलेल्या कामोठे शहरात स्वतंत्र अग्निशामक केंद्र नसल्याने एखादी आगीची दुर्दैवी घटना घडली तर या शहराला कळंबोली खारघर सारख्या इतर शहरांच्या अग्निशामक केंद्राकडून मदत घ्यावी लागते , त्यामुळे या शहराला स्वतंत्र अग्निशामक केंद्र मिळावे अशी मागणी वारंवार जोर धरत आहे.

सिडको ने वसविलेल्य कामोठे शहर याची ओळख म्हणजे नाव मोठे लक्षण खोटे असेच आहे कारण या ठिकाणी मूलभूत गरजा वेळेवर उपलब्द होत नसल्याने येथील नागरिक मेटाकुटीला आले आहेत .या ठिकाणी प्रामुख्याने भेडसावणाऱ्या प्रश्नांपैकी पाणीपुरवठा , सार्वजनिक आरोग्य केंद्र व प्रामुख्याने जिव्हाळ्याचा प्रश्न सध्या अग्निशामक केंद्र भेडसावत आहे. २ लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या या कामोठे शहरात सध्या सोयी सुविधांचा वनवा पहावयास मिळतो.कामोठेतील विविध सेक्टर प्रमाणे बऱ्याच सेक्टरमध्ये वारंवार अपुरा पाणीपुरवठा असल्याने आज देखील डोक्यावर हंडे घेऊन लोक पाणी आणत आहेत. कामोठे कॉलनी फोरमच्या वतीने कामोठे शहराला अग्निशमन केंद्र मिळावे यासाठीमागणी करण्यात आली आहे . याबाबत लवकरच सकारात्कम पावले उचललली जाणार आहेत मात्र सध्यातरी या शहरातील आगीच्या घटनांसाठी इतर शहरांचा आधार घ्यावा लागणार आहे .कामोठे शहराला लागून कळंबोली शहर आहे कळंबोली शहराला असलेले स्वतंत्र अग्निशामक तसेच खारघर शहरातील अग्निशमन केंद्रातून कामोठ्याला अवलंबून राहावं लागत असून लवकरात लवकर या शहरातील सुसज्ज अग्निशमन केंद्र सुरु करावे याची प्रतीक्षा भेड्सावत आहे.

# उरणच्या ग्रामीण भागातही डेंग्यूचे रुग्ण

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जनतेला सध्या सर्दी ,खोकला, ताप, कावीळ ,मलेरिया यासारख्या आजारांनी ग्रासले आहे. परिणामी उरणच्या ग्रामीण भागात येणाऱ्या वशेणी गावात– ३ खोपटे गावात–२ कोप्रोली गावात–३ सारडे गावात–१ पाले गावात –१ व चिरनेर गावातील –२ रुग्ण हे डेंग्यू सारख्या जीव घेण्या आजारांवर उरण तालुक्यातील कोप्रोली येथील श्री सिद्धिविनायक या खाजगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी दाखल झाले होते. मात्र आता त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यामुळे, त्यांना घरी सोडण्यात आले आहेत. परीणामी येथील रहिवाशांमध्ये सध्या भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

उरण तालुक्याचे औद्योगीकरण झपाट्याने वाढत असल्याने, अशा वाढत्या औद्योगिकरणामुळे प्रदूषणातही तेवढ्याच प्रमाणात वाढ होत आहे. अशा वाढत्या औद्योगिकरणामुळे व प्रदूषणामुळे तालुक्यात जीव घेण्या कॅन्सरच्या तसेच हृदयविकाराच्या रुग्णात देखील दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे या तालुक्यात आधुनिक रुग्णालयाची उभारणी लवकरात लवकर करण्यात यावी, अशी मागणी वारंवार येथील जनता व सामाजिक संघटना करीत आहेत. त्यात नुकत्याच झालेल्या परतीच्या पावसाच्या हवामानातील बदलामुळे उरण तालुक्यातील जनतेला सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी, कावीळ, आणि आता मलेरिया, डेंग्यू सारख्या इतर आजारांनी ग्रासले आहे.

हे चित्र खाजगी, शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल होणाऱ्या रुग्णांच्या संख्येतून, पुढे येत आहे. त्यात सध्या येथील शासकीय रुग्णालयात असणाऱ्या सुविधांच्या अभावामुळे अनेक रुग्णांना उदभवणाऱ्या आजारांवर उपचार करून घेण्यासाठी, पनवेल, नवी मुंबई शहरातील रुग्णालयात दाखल व्हावे लागत आहे.

त्यामुळे या तालुक्यात आधुनिक रुग्णालयाची उभारणी लवकरात लवकर करण्यात यावी, अशी मागणी येथील ग्रामीण जनतेतून जोर धरू लागली आहे.

# विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी नवऱ्यासह सासू सासऱ्यांविरुद्ध गुन्हा

**दै.रायगड नगरी । महाड**

मुलगी झाली म्हणून विवाहितेचा शारिरिक आणि मानसिक छळ करणार्या नवर्यासह सासू सासर्यांविरोधात महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सो. सेविका सुमित उतेकर (वय २५, रा. चांढवे खुर्द ता. महाड, सध्या उसरोली खुर्द, ता. उपनवेल) या महिलेने या प्रकरणी फिर्याद दिली आहे. सुमित उतेकर याच्याबरोबर तिचा विवाह झाला होता.

विवाह झाल्यापासूनच सुमित तिच्या शारिरिक ठेवणीवरून तिला त्रास देत होता. त्यानंतर तिला मुलगी झाल्याने त्याचा राग मनात धरून तो वारंवार पिडितेला शिविगाळ करून, मारहाण करीत होता. तिच्या सासू सासर्यांनीही तिला शारिरिक आणि मानसिक छळजाच सुरू केला होता.

या प्रकाराला वैतागून सेविका उतेकर हिने महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात नवरा आणि सासू सासर्यांविरोधात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी या महिलेचा नवरा सुमित उतेकर, सासू नम्रता उतेकर आणि सासरा नरेंद्र उतेकर )सर्व रा. चांढवे खुर्द, ता. महाड) यांच्याविरोधात भादंवि कलम ४९८ अ, ३५२, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी अधिक तपास महिला पोलीस नाईक एस.टी. सावंत या करित आहेत.

# नांदगाव समुद्रकिनारी आढळला मृत डॉल्फिन मासा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील समुद्रकिनारी सर्पमित्र संदीप घरत हे सकाळच्या वेळेत मासेमारीसाठी गेले असता त्यांना समुद्रकिनारी एक डॉल्फिन मासा मृतावस्थेत आढळून आला.त्यांनी वनविभागाचे प्रभारी वनपरिक्षेत्र अधिकारी मनोज वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल बी.जी.शिवगुंडे, स्थानिक लोकप्रतिनिधी,ग्रामपंचायत यांच्या सहकार्याने आरोग्याच्या दृष्टीने सदर माशाचे दफन करण्यात आले.

सर्पमित्र संदीप घरत हे सकाळच्या वेळी नांदगाव समुद्रकिनारी मासेमारीसाठी गेले असता त्यांना समुद्रकिनारी एक सहा फूट लांबीचा व ८० किलो वजनाचा डॉल्फिन मासा मृतावस्थेत आढळून आला.याबाबत त्यांनी ग्रामपंचायत उपसरपंच अस्लम हलडे, सामाजिक कार्यकर्ते भाई सुर्वे, माजी उपसरपंच जितेंद्र दिवेकर, ग्रामसेवक म्हात्रे, कर्मचारी तसेच वनविभागाचे वनपाल बी.जी.शिवगुंडे, तसेच पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.पवार यांच्याशी संपर्क साधून कळविण्यात आले.यावेळी वनविभागाचे वनपाल यांनी सदर प्रकरणी रितसर पंचनामा करण्यात येऊन आरोग्याच्या दृष्टीने दुर्गंधी पसरु नये म्हणून उपस्थितांच्या सहकार्याने समुद्रकिनारी एका खड्ड्यात या डॉल्फिन माशाचे दफन करण्यात आले.



# लोकहितांचे प्रकल्प, स्थानिकांच्या विकासाला गती देण्यासाठी किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा महत्वपूर्ण ठरेल : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

'पर्यावरण रक्षण हे आपले कर्तव्यच आहे. पण लोकहितांचे विविध प्रकल्प तसेच स्थानिकांच्या विकासाला गती मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा महत्वपूर्ण ठरेल,' असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. महाराष्ट्र सागरी किनारा विकास प्राधिकरणाने तयार केलेला किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा मुख्यमंत्री श्री. शिंदे यांना सादर करण्यात आला. पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठीचा हा किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन आराखडा केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडे पाठवण्यास मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली.

मंत्रालयात समिती सभागृहात झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीस महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव नितीन करीर, पर्यावरण विभागाचे सचिव प्रवीण दराडे, वन विभागाचे प्रधान सचिव वेणु गोपाल रेड्डी, पशु संवर्धन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन, पर्यटन विभागाचे सचिव सौरभ विजय, पर्यावरण विभागाचे संचालक नरेंद्र टोके आदी उपस्थित होते.

पर्यावरण विभागाचे सचिव श्री. दराडे यांनी पाच जिल्ह्यांकरिताच्या आराखड्याचे सादरीकरण केले. किनारपट्टी क्षेत्राचे नियमन अधिनियमन–२०१९ नुसार हा प्रारूप आराखडा तयार करण्यात आला. त्यामध्ये चेन्नईच्या नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट या संस्थेने किनारपट्टीच्या क्षेत्राचे भरती व ओहोटी रेषेचे आलेखन केले. त्यावर पाच जिल्ह्यातून सूचना व हरकती मागवून हा प्रारूप आराखडा तयार करण्यात आला. यात सागरी नियमन क्षेत्राचे चार प्रकारात वर्गीकरण आहे.

त्यामध्ये परिस्थितीकी दृष्ट्या संवेदनशील, विकसित भाग, ग्रामीण भाग आणि पाण्याचा भाग यांचा समावेश आहे. यात पुर्वीच्या २०११ च्या अधिसुचनेतील भरती रेषेपासूनची १०० मीटर अंतरापर्यंतची मर्यादा आता खाडी, नद्या, नाले या क्षेत्रांकरिता ५० मीटर पर्यंत करण्यात आली आहे.

यामुळे या पर्यटन उपक्रमांनाही चालना मिळणार आहे. स्थानिक मच्छिमारांना आणि पारंपरिक घरांच्या बांधकाम व दुरूस्तीची परवानगीची प्रक्रिया सुलभ होणार आहे. निवासी घरांसाठी ३०० वर्ग मीटरपर्यंत बांधकामांसाठी स्थानिक नियोजन प्राधिकरण परवानगी देऊ शकेल, असे प्रस्तावित आहे.

तसेच स्थानिक लोकांची जूनी घरेही नियमित केली जाऊ शकणार आहेत. किनारपट्टीच्या भागामध्ये स्थानिक नागरिकांकरिता सामुदायिक पायाभूत सुविधा उभे करणे शक्य होणार आहे. स्थानिक कोळी बांधवांच्या मासेमारी व पारंपरिक व्यवसायासाठी आवश्यक अशा वाळवण, मासळी बाजार, जाळी बांधणी, होड्यांची दूरूस्ती यांनाही परवानगी दिली जाणार आहे. किनारपट्टी भागात राहणाऱ्या स्थानिक लोकांना पर्यटनाच्या माध्यमातून उदरनिर्वाहासाठी घरगुती मुक्काम पर्यटन सुविधा देता येणार आहे. तसेच पर्यटन क्षेत्रासाठीच्या आवश्यक अशा समुद्रकिनारा शॅक (खोपटी), प्रसाधनगृहे, बैठक व्यवस्था आदी तात्पुरत्या पर्यटन सुविधांना परवानगी देणे शक्य होणार आहे.

# पाली बस स्थानकातील सार्वजनिक स्वच्छतागृह जलद सुरु करा, अन्यथा मनसे स्टाइलने दणका देऊ

## निवेदनातून मनसेचा आंदोलनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली बस स्थानकातील सार्वजनिक स्वच्छतागृह प्रवासी व जनतेसाठी खुले करण्यात यावे अशी मागणी सुधागड मनसे तर्फे करण्यात आली आहे. या संदर्भातील निवेदन नुकतेच पाली परिवहन कार्यालयाला देण्यात आले. पाली बस स्थानकातील सार्वजनिक स्वच्छतागृह जलद सुरु करा, अन्यथा मनसे स्टाइलने दणका देऊ, असा इशारा मनसेने निवेदनातून दिला आहे.

दीड वर्षांपूर्वी पाली बस स्थानकाच्या नूतनीकरणासाठी बसस्थानक इमारत तोडण्यात आली आहे. तात्पुरती व्यवस्था म्हणून स्थानक आवारात प्रवासी शेड, कार्यालय, कर्मचारी निवारा खोली व स्वच्छतागृह बांधण्यात आले आहे. मात्र हे सार्वजनिक स्वच्छतागृह प्रवाशांसाठी सुरू केलेले नाही. परिणामी प्रवाशांची विशेषतः स्त्रीयांची मोठी गैरसोय होत आहे. तालुक्यातील नागरिक, विद्यार्थी व राज्य भरतील भाविक येथे येतात. त्यामुळे स्वच्छतागृहाच्या अभावी त्यांची कुचंबणा होत आहे. ही बाब मनसे पाली शहर अध्यक्ष दिपेश लहाने यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी हे सार्वजनिक स्वच्छतागृह नागरिकांसाठी तसेच प्रवाशांसाठी चालू करण्यासाठी मनसेकडून परिवहन व्यवस्थापक पाली सुधागड यांच्याकडे मागणी केली. हे जर स्वच्छतागृह नागरिकांसाठी सुरू केले जात नसतील तर सुधागड मनसे पदाधिकारी व कार्यकर्ते मनसे स्टाईल ने आंदोलन करेल अशा इशारा देण्यात आला. व यास सर्वस्वी परिवहन महामंडळ जबाबदार असतील असे सांगण्यात आले.



निवेदन देतेवेळी मनसे पाली शहर अध्यक्ष दिपेश लहाने, मनविसे सुधागड तालुका अध्यक्ष भावेश बेलोसे, जांभूळपाडा विभाग अध्यक्ष शेखर चव्हाण, मनसैनिक सनी यादव, सामाजिक कार्यकर्ते राकेश ठाकूर आणि अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.